सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १३० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १४ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन स्थगित

## उदय सामंत यांची शिष्टाई; मागण्या मान्य न झाल्यास २ ऑक्टोबरला मंत्रालयात शिरण्याचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी गत ७ दिवसांपासून अन्नत्याग उपोषण करणाऱ्या बच्चू कडू यांनी शनिवारी आपले उपोषण स्थगित करण्याची घोषणा केली. या प्रकरणी त्यांनी सरकारला आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी २ ऑक्टोबरपर्यंतची मुदत दिली आहे. सरकारने आमच्या मागण्या मान्य केल्या नाही तर २ ऑक्टोबर रोजी आम्ही थेट मंत्रालयात शिरू, असे ते या प्रकरणी सरकारला इशारा देताना म्हणालेत.

प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू गत ७ दिवसांपासून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी अन्नत्याग उपोषण करत होते. या उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावली होती. डॉक्टरांनी त्यांना रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला होता. पण त्यानंतरही बच्चू कडू यांनी आपले उपोषण नेटाने पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला होता. त्यांनी परवापासून थेट अन्नत्याग करण्याचाही इशारा दिला होता. त्यामुळे मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी तातडीने त्यांची भेट घेऊन त्यांना सरकार आपल्या मागण्यांवर सकारात्मक असल्याचे सांगत त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. त्यानंतर बच्चू कडू यांनी उदय सामंत यांच्या विनंतीचा मान राखत आपले अन्नत्याग उपोषण मागे घेण्याची घोषणा केली. उद्याचे चक्का जाम आंदोलन स्थगित करण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.





**२ ऑक्टोबरला थेट मंत्रालयात शिरणार**

बच्चू कडू उपस्थितांशी संवाद साधताना म्हणाले, सरकारने आपल्या मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आपण हे आंदोलन मागे घेत नाही, तर स्थगित करत आहोत. सरकारने आपल्या मागण्यांवर ठोस निर्णय घेतला नाही, तर २ ऑक्टोबर रोजी आपण थेट मंत्रालयात शिरू. आपण सरकारला छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखा चकवा देऊ. सांगू नागपूरला व जाऊ मुंबईला. यांना आपण एकदा छत्रपतींचा गनिमी कावा दाखवू.

मुख्यमंत्री सध्या आम्हाला तारीख सांगण्यास तयार नाहीत. पण आम्ही त्यांना २ ऑक्टोबरची तारीख दिली आहे. या तारखेपर्यंत सरकारला कर्जमाफी द्यावीच लागेल. अन्यथा आम्ही त्यांना माफ करणार नाही. आत्ता आपण हे अन्नत्याग आंदोलन स्थगित करत आहोत. मी कार्यकर्त्यांचा अंत पाहू शकत नाही. ते माझ्याशिवाय उठण्यास तयार नाहीत. एक आज्जी तर ऐकण्यास तयारच नव्हती. सर्वच जातीधर्माच्या लोकांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. त्यांचे मी आभार मानतो. हे यश आमचे नव्हे तर इथे येणाऱ्या सर्वांचे यश आहे.

**महायुती सरकारकडून लेखी आश्वासन**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी (१३ जून) आंदोलन स्थळी जाऊन बच्चू कडू यांची भेट घेतली. या भेटीवेळी त्यांनी बच्चू कडू यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर सरकारच्या वतीने बच्चू कडू यांना लेखी आश्वासन दिले.

शेतकरी कर्ज माफीसाठी १५ दिवसामधे उच्चस्तरीय समिती नेमली जाईल. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर कर्ज माफी संदर्भात निर्णय घेण्यात येईल तथा थकीत कर्जदाराच्या सक्तीच्या वसुलीला स्थगिती देणे व नवीन कर्ज वाटप करण्यासाठी बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल.

दिव्यांगाच्या मानधन वाढी बाबत ३० जून च्या पुरवणी बजेट मध्ये तरतूद करण्यात येईल. उर्वरित मुद्यावर संबंधित मंत्री तथा मुख्यमंत्री महोदय यांचे सोबत बैठक घेऊन मागण्या निकाली काढल्या जातील.

**अन्नत्याग आणि चक्का जाम आंदोलन स्थगित**

सरकारकडून प्रमुख मागण्यांसदर्भात लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर बच्चू कडू यांनी चक्का जाम आंदोलन स्थगित करत असल्याची घोषणा केली.


सरकारतर्फे लेखी आश्वासनानंतर अन्नत्याग आंदोलन स्थगित केले आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी. तसेच उद्या (१५ जून) होणारे चक्का जाम हे देखील स्थगित करण्यात आले आहे, असे बच्चू कडू यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सांगितले.

# एअर इंडियानं घेतला '१७१' आकड्याचा धसका
## अहमदाबाद दुर्घटनेनंतर इतिहासजमा होणार संख्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

गुजरातच्या अहमदाबाद येथून लंडनसाठी निघालेले एअर इंडियाच्या एआय १७१ फ्लाईटचा भीषण अपघात झाला. या अपघातात २४१ प्रवाशी मृत पावले. या दुर्घटनेनंतर एअर इंडिया प्रशासन हा नंबर बदलण्याच्या तयारीत आहे. या मागचा हेतू म्हणजे या भयंकर अपघाताची कटू आठवण विसरण्यासाठी केले जाणार आहे. सामान्यत: एका भीषण अपघातानंतर एअरलाईन्स संबंधित उड्डाण संख्येचा वापर करणे बंद करते.

विमान अपघातानंतर एअर इंडियाने आवश्यक पाऊले उचलली आहे. त्यात प्रामुख्याने या दुर्घटनेतील मृत लोकांच्या वारसांना प्रत्येकी १ कोटी मदत जाहीर करण्यात आली आहे. आता यापुढे अहमदाबाद ते लंडनला जाणाऱ्या विमानाचा नंबर AI 171 ऐवजी AI 159 करण्यात आला आहे. १७ जूनपासून बुकिंग प्रणालीत आवश्यक बदल करण्यात येणार आहेत. हा फ्लाईट नंबर बदलण्यामागे एक खास हेतू आहे. आकडा बदलल्यानंतर दुर्घटनाग्रस्त विमानातील मृतांच्या कुटुंबांना आणि इतरांनाही त्यातून सावरण्यासाठी मदत मिळेल. एअर इंडिया एक्सप्रेसनेही त्यांची उड्डाणसंख्या IX 171 बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे सूत्रांच्या हवाल्याने सांगण्यात येत आहे. उड्डाण संख्या १७१ बंद करून अपघातातील मृतांप्रती सन्मान दिला.



# शिरसाटांना नोटीस पाठवा, वकिलांना पेमेंट मी करतो; गंभीर आरोप करत जलील यांनी दंड थोपटले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४संभाजी नगर**

राज्याचे मंत्री आणि शिवसेना नेते संजय शिरसाट यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील अनेक गंभीर आरोप करत आहे. त्यांनी मंत्री शिरसाट यांच्यावर बेकायदेशीररित्या मालमत्ता खरेदी, एमआयडीसीतील भूखंड आणि सरकारी जमीनीमध्ये घोटाळा असे अनेक गंभीर आरोप केले आहे. तर या आरोपांना प्रत्युत्तर देत मी इम्तियाज जलील यांना कायदेशीर नोटीस पाठवणार असं शिरसाट यांनी म्हटले होते. तर आता संजय शिरसाट यांनी मला नोटीस पाठवावे मी वकिलांची फी देतो असा टोला जलील यांनी लावला आहे. इम्तियाज जलील यांनी आज पत्रकार परिषद घेत पुन्हा एकदा मंत्री शिरसाट यांच्यावर गंभीर आरोप केले आहे.




इम्तियाज जलील यांनी पत्रकार परिषद घेत संजय शिरसाट यांनी आपल्या मुलांच्या नावे सहाजापूर येथे दहा एकर वर्ग दोनची जमीन खरेदी केल्याचा आरोप केला होता तसेच त्या संदर्भातील पुरावे देखील त्यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिले होते. पत्रकार परिषदेमध्ये बोलताना त्यांनी हरिजन असा उल्लेख केला होता. यावरुन संभाजीनगरमधील विविध पोलीस ठाण्यात जलील यांच्या विरोधात ट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. मात्र पोलीस संजय शिरसाट यांच्या दबावाखाली काम असल्याचा आरोप आज झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये माजी खासदार जलील यांनी केला आहे.

या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना माजी खासदार इम्तियाज जलील म्हणाले की, माझ्या विरोधात अनेक पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. मात्र पोलिसांनी शहानिशा न करता माझ्यावर गुन्हा दाखल केला आहे. पोलीस नेत्यांचे गुलाम झाले आहेत. या प्रकरणात मी आता उच्च न्यायालयात जाणार आहे. या प्रकरणात पोलीस आयुक्त आणि संबंधित अधिकारी यांना न्यायालयात खेचणार असा इशारा जलील यांनी या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना दिला. तसेच ज्या हरिजन शब्दाच्या उल्लेखामुळे आपल्यावर ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो शब्द सरकारी कागदावर देखील नमूद करण्यात आला आहे. मी तो फक्त वाचून दाखवला, जर माझ्यावर गुन्हा दाखल केला तर मग जिल्हाधिकारी, महसूल विभाग आणि सरकारवरही गुन्हा दाखल करा अशी मागणी देखील जलील यांनी यावेळी केली.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर शासन सकारात्मक, पण अजित पवारांच्या कार्यक्रमातील गोंधळानंतर दादा भुसेंनी व्यक्त केली नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ पुणे**

पुण्यात आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा कार्यक्रम सुरु असतांना राष्ट्रसंतांच्या भूमीत बच्चू कडू यांचं जे आंदोलन सुरू आहे. त्यांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांचे प्रतिनिधी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या कार्यक्रमात आले होते. त्यावेळी तेथे गोंधळ निर्माण झाला. मात्र त्यावेळी अजित पवारांनी त्यांना समजावून सांगितले. तसेच या अगोदर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी शासनाचे प्रतिनिधी म्हणून चंद्रशेखर बावनकुळे यांना चर्चेसाठी पाठवलं होतं. त्यावेळी बच्चू कडू यांनी विचार करून सांगतो असं सांगितलं होतं. त्यांच्या मागण्यांवर एक समिती गठीत करण्याचं अश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.त्यावर स्वत: बच्चू कडू हे असणार आहेत.

तर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर शासन सकारात्मक आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात त्यावर निर्णय होईल. कारण या सरकारने अनेक चांगल्या योजना आणल्या आहेत. त्यामध्ये वीज, पीएम किसान यासह अनेक योजना आणल्या आहेत. त्यामुळे बच्चू कडू यांच्या मागण्या केल्या त्यापासून सरकार दूर जात नाही. आमचा त्याला मान्यता आहे. अजित पवारांनी देखील तेच सांगितलं आहे. तरीही कार्यकर्त्यांनी कार्यक्रमात गोंधळ घातला यावर मंत्री महोदयांनी नाराजी व्यक्त केली.

# दिवाळीनंतर उडणार राजकीय धुराळा! निवडणूक तयारीचा मुहूर्त ठरला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी (चरहरीरीहीर एश्रशलींळेप) ६ मे २०२५ रोजी सुप्रीम कोर्टाने चार आठवड्यांत अधिसूचना जाहीर करण्याचे निर्देश दिले. जसं की २०२२ च्या OBC आरक्षणाच्या नियमांच्या आधीचे प्रणाली कायम राहील. राज्य सरकारने २९ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत मुंबई (BMC) आणि इतर महापालिकांसाठी प्रारूप प्रभाग जाहीर करण्याचा निर्णय घेतला. नगरविकास विभागाने प्रभागरचना कमिशन सुरु केली आहे. आराखडा चार सदस्यीय संरचनेवर आधारित होणार आहे.



महापालिका, नगर परिषद व महापालिकांच्या निवडणुकीचे नियंत्रण तीन ते चार टप्प्यांमध्ये होणार असून परिणामी शेवटच्या सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात हे सर्व काम पूर्ण होण्याची शक्यता आहे.

**आरक्षणाची क्रिया**

प्रभागरचना पूर्ण झाल्यानंतर आरक्षण निर्धारण, मतदारयादी अद्ययावत करणे, तसेच एतच् इतर प्रशासकीय तयारी सप्टेंबर-ऑक्टोबर दरम्यान केली जाईल. राज्य निवडणूक आयोगाच्या नवीन नियमांनुसार, प्रत्येक पक्षाला किमान पाच जागांसाठी लढा देणे अनिवार्य ठरत आहे.

**अधिसूचना व मतदान**

प्रभागरचना पूर्ण झाल्यावर सुमारे ५५ ते ६० दिवसांच्या प्रशासनिक तयारीनंतर निवडणूकीचे कार्यक्रम जाहीर होऊ शकतात. त्यामुळे दिवाळीनंतर, म्हणजे ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान मतदान होण्याची शक्यता प्रबल आहे; मात्र काही विलंबामुळे हा कालावधी नोव्हेंबर-डिसेंबर पर्यंत जाऊ शकतो . नाशिकमध्ये शिवसेना आणि भाजप यांच्यातील महायुती, मुंबई-पुणे-ठाण्यातील महायुती आणि महाविवाकस आघाडी संघर्ष हे निवडणुकांचे रणविस्तार देखील दाखवतात . विषम परिस्थितीत स्थानिक नेतृत्वाला स्थान मिळवण्यासाठी नवीन रणनिती राबवावी लागणार आहे.

**निवडणूकीची प्रक्रिया**

महाराष्ट्रातील महापालिका अन् नगरपालिका निवडणुका दिवाळीनंतर, ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान होणार, असे संकेत आहेत. सुप्रीम कोर्टाच्या कठोर निर्देशा आणि राज्य सरकारच्या टप्प्याटप्प्याच्या तयारीमुळे ही प्रक्रिया गतिमान झाली आहे. राजनीतिक चक्रवाढ, नव्या मतदारांच्या वाढत्या उपस्थितीमुळे आणि बजेट वाढीमुळे प्रशासन, पक्ष आणि नागरिक यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे आता ही निवडणूक सत्तात्मक संधी आणि स्थानिक स्वराज्यासाठी निर्णायक ठरणार असल्याचं कळतंय.

# नदीजोड प्रकल्प म्हणजे दुष्काळी भागांसाठी वरदान - मंत्री विखे पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

नदीजोड प्रकल्पाचा उद्देश काय आहे, हे समजून घेऊन जलसंपदा विभागाने काम सुरू केले आहे. 'मोठा विचार करा' मंत्र अंगीकारून महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलण्याचा निर्धार केला आहे. उपलब्ध साधनांमध्ये राज्य दुष्काळमुक्त करण्याकडे वाटचाल करायची, हेच ध्येय असले पाहिजे. विस्तारलेल्या जगाकडे विस्तारलेल्या नजरेने पाहायला शिका, असे आवाहन मी जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांना केले आहे. चाकोरीच्या बाहेर जाऊन विचार केल्याने यश मिळते. नदीजोड प्रकल्प फक्त सादरीकरणा पुरता राहणार नाही. महाराष्ट्र पाणी परिषदेने पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे, असे मी मानतो.



पंतप्रधान व मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली ती पार पाडण्यात यश येईल, असा आत्मविश्वास वाटतो. महाराष्ट्राला प्रगतिपथावर नेणे, हाच नदीजोड प्रकल्पाचा एकमेव उद्देश आहे. पाणी आपल्याला एकत्र आणणारे साधन आहे. आपल्या उद्याच्या पिढ्यांसाठी पाणी जपून ठेवण्याकरिता आज एकत्र काम करायला हवे! त्यासाठी महाराष्ट्र सरकार कटिबद्ध असल्याचा विश्वास जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.


जगाकडे पाहत देशाच्या भविष्याचा विचार करणारे पंतप्रधान मोदी नदीजोड प्रकल्पाबाबत आग्रही आहेत. त्यातून विकासाची गंगा दूरपर्यंत पोहोचेल, असा ठाम विश्वास व्यक्त करुन, मंत्री विखे पाटील म्हणाले की, दिवंगत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या स्वप्नाला मूर्त रूप देण्यासाठी नदीजोड प्रकल्पाची कामे आता गतीने पुर्णत्वास नेणे यासाठी केंद्र आणि राज्य सरकारचे प्रयत्न आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र सरकारही त्या दिशेने ठोस पावले उचलत आहे. फडणवीस यांनी जलसंपदा खात्याचे कामकाज अडीच वर्षे पाहिले. त्यांनी खात्यातील कामकाजाला नवे रूप दिले. त्यांनीच नदीजोड प्रकल्पाला सर्वाधिक गती दिली. पाण्यावाचून तळमळणाऱ्या महाराष्ट्रातील दुष्काळी भागासाठी हे प्रकल्प वरदान ठरणारे आहेत. हे लक्षात घेऊनच राज्य सरकारच्या यंदाच्या अंदाजपत्रकात नदीजोड प्रकल्पांसाठी भरीव तरतूद करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

# अहमदाबाद विमान अपघात की अन्य काही?; उच्चस्तरीय समितीला तपासासाठी सरकारने दिली डेडलाईन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अहमदाबाद**

१२ जून रोजी अहमदाबादमध्ये भीषण विमान अपघात घडला. या अपघातात २५० हून अधिक लोकांचा जीव गेला. या दुर्घटनेतर शनिवारी पहिल्यांदाच नागरी उड्डाण मंत्रालयाने पत्रकार परिषद घेतली. एअर इंडिया फ्लाईट एआय १७१ ने अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण घेतल्यानंतर केवळ ६५० फूट उंचीवर पोहचू शकले. ज्यानंतर हे विमान वेगाने खाली आले असं मंत्रालयाने सांगितले.

या पत्रकार परिषदेत नागरी उड्डाण मंत्रालयाचे सचिव समीर कुमार सिन्हा म्हणाले की, विमानाने उड्डाण घेतल्यानंतर केवळ ६५० फूट उंची गाठू शकली. त्यानंतर हे विमान खाली येऊ लागले. पायलटने दुपारी १.३९ वाजता एटीसीला मे डे कॉल



दिला होता. एक मिनिटानंतर विमान मेघानीनगर भागातील मेडिकल कॉलेज परिसरात कोसळले. या दुर्घटनेआधी हे विमान पॅरिस-दिल्ली-अहमदाबादला विना कुठल्याही तांत्रिक समस्येशिवाय पोहचले होते असंही त्यांनी सांगितले.

संपादकीय ......

# का कोसळले ड्रीमलायनर?

अहमदाबादमध्ये एअर इंडियाचे विमान कोसळून झालेली दुर्घटना दुर्दैवी आणि तितकीच चिंताजनक आहे. वास्तविक, बोईंग- ७८७ ड्रीमलायनर ही विमाने सुरक्षित मानली जातात. या अपघातातील वैमानिकही अनुभवी आणि प्रशिक्षित होता. मग नेमके काय घडले ज्यामुळे एकाएकी २४२ प्रवाशांना घेऊन जाणारे हे विमान कोसळले? अहमदाबादमधील विमानाचा अपघात हा मोठा हादरा देणारा ठरला आहे.

एअर इंडियाचे अहमदाबादहून लंडनकडे जाणारे ड्रीमलाइनर बोईंग विमान सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण करताच काही मिनिटांतच अपघातग्रस्त झाले आणि १६९ भारतीय नागरिक, ५३ ब्रिटिश, ७ पोर्तुगीज आणि एक कॅनेडियन नागरिक यांसह दोन वैमानिक आणि दहा केबिन क्रू सदस्य प्रवास करता यापैकी जवळपास सर्वांवर मृत्यूचा डोंगर कोसळला. विमान जमिनीवर आदळल्यावर मोठा स्फोट झाला आणि त्यानंतर संपूर्ण विमानाला आग लागली. अपघातस्थळी मदतकार्य सुरू करताना अग्निशमन दल, एनडीआरएफ पथक आणि वैद्यकीय तज्ज्ञांनी युद्धपातळीवर बचावकार्य राबवले; पण जीवितहानी टाळता आली नाही. अपघातानंतर आता तांत्रिक ऑडिट सुरू करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. भारत सरकारच्या नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने उच्चस्तरीय चौकशी समिती नेमली असून विमान अपघाताची सखोल चौकशी केली जाणार आहे; पण या दुर्घटनेचे दूरगामी परिणाम होणार आहेत.

भारतीय नागरी विमान वाहतुकीचा इतिहास जरी प्राचीन असला, तरी 'एअर इंडिया' या राष्ट्रीय विमानसेवेचे स्थान त्यात केंद्रस्थानी राहिले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात १९३२ मध्ये जेव्हा जे. आर. डी. टाटांनी 'टाटा एअरलाइन्स'ची स्थापना केली, तेव्हा कोणीही कल्पना केली नव्हती की ही छोटी हवाई सेवा पुढे भारताचे विमान वाहतुकीचे प्रतीक ठरेल. स्वातंत्र्यानंतर सरकारने ती 'एअर इंडिया' या नावाने राष्ट्रीयीकृत केली आणि अनेक दशके ही कंपनी भारताच्या हवाई वाहतुकीची ओळख बनली. एअर इंडियाच्या इतिहासात अनेक अपघातांचे स्मरण कायमचे ठसे उमटवणारे ठरले आहेत. त्यामध्ये काही भीषण आंतरराष्ट्रीय अपघात होते, जे केवळ भारतालाच नव्हे तर जागतिक विमान वाहतुकीला हादरवणारे ठरले. १९८५ साली मॉंट्रियलहून लंडनमार्गे मुंबईला येणारे 'कनिष्क' विमान आयरिश समुद्रात बॉम्बस्फोटात कोसळले. हा आतापर्यंतचा भारतातील सर्वात मोठा विमान स्फोट होता, ज्यात ३२९ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतरच्या दशकांत एअर इंडियाचे अनेक छोटे-मोठे अपघात झाले. त्यात वैमानिकांच्या चुकांपासून तांत्रिक बिघाडांपर्यंत विविध कारणे होती. २०१० मध्ये मंगळूर विमानतळावर एअर इंडिया एक्स्प्रेसचे विमान धावपट्टीवरून घसरून कोसळले आणि १५८ प्रवाशांचा मृत्यू झाला.

सुमारे सात दशकांनंतर, २०२२ साली टाटा समूहाने एअर इंडिया परत विकत घेतली. टाटा समूहाने केवळ आर्थिक गुंतवणूकच नाही तर व्यवस्थापन, कर्मचारी प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय भागीदारी अशा विविध स्तरांवर पुनरुज्जीवनाचे प्रयत्न सुरू केले. विमान सेवेसाठी विश्वास, सुरक्षा आणि मानवतेची जबाबदारी घेणे हेही तितकेच आवश्यक आहे ही टाटा समूहाची कार्यदृष्टी होती. त्यामुळे त्यांनी अनेक जुनी विमाने सेवानिवृत्त करत नवे बोईंग व एअरबस खरेदीचे करार केले. तांत्रिक निगा, ग्राहक सेवा, ऑन-टाईम परफॉर्मन्स, डिजिटल बुकिंग प्रक्रिया आणि हवाई सुरक्षेतील नवे प्रोटोकॉल यावर भर दिला गेला. परंतु अहमदाबादमधील विमानाचा अपघात हा या सर्व प्रयत्नांना मोठा हादरा देणारा ठरला. ड्रीमलाइनरसारख्या अत्याधुनिक विमानाच्या अपघाताने पुन्हा एकदा विमान प्रवासाच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न उभे राहिले. हे केवळ एक तांत्रिक अपयश मानता येणार नाही.

विमानाने उड्डाण घेतल्यावर काही क्षणांतच कॉकपिटमधून 'मायडे' कॉल दिला होता. हा कॉल म्हणजेच आपत्कालीन परिस्थिती दर्शविणारा संकेत; पण त्यानंतर लगेचच एअर ट्रॅफिक कंट्रोलशी संपर्क तुटला आणि काही क्षणांतच लोकांनी आकाशातून धूर आणि अग्नीच्या ज्वाळा पडताना पाहिल्या. ही घटना संपूर्ण देशाला हादरवणारी ठरली आहे. सध्या दुर्घटनाग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स (फ्लाइट डाटा रेकॉर्डर आणि कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डर) शोधण्याचे आणि त्याच्या तपासणीतून नेमकं कारण शोधण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. बोईंग कंपनी आणि एअर इंडिया यांनीही ही घटना अत्यंत गंभीरतेने घेतली असून तांत्रिक तपासणी सुरू केली आहे.

या घटनेमागील नेमके कारण समोर यायला अजून वेळ लागेल; मात्र जागतिक स्तरावर विमान अपघातांची कारणे पाहता काही संभाव्य शक्यता स्पष्टपणे मांडता येतात. जागतिक नागरी विमान वाहतूक संस्थांच्या आकडेवारीनुसार, सुमारे ७०-८० टक्के अपघात हे मानवी चुका म्हणजेच पायलटच्या निर्णयातील किंवा प्रतिसादातील त्रुटींमुळे होतात. विशेषतः टेकऑफ आणि लँडिंगच्या काळात - जो संपूर्ण फ्लाइट वेळेचा फक्त १० टक्क्यांहून कमी असतो - अपघात होण्याची शक्यता सर्वाधिक असते.






## वजन कमी करण्यासाठी 'असं' प्या पाणी, वजन होईल झरझर कमी - तब्येत राहील ठणठणीत...

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक आरोग्य**

वेटलॉससाठी नेमकं किती प्रमाणात पाणी पिणे आवश्यक...

प्रत्येक व्यक्तीच्या शरीरानुसार पाण्याची गरज वेगवेगळी असते. एका निरोगी प्रौढ व्यक्तीने दररोज सुमारे २.५ ते ३ लिटर पाणी प्यायला हवे. परंतु जर तुम्ही वजन कमी करत असाल, विशेषतः नियमित एक्सरसाइज करत असाल, तर पाण्याचे हे प्रमाण थोडं वाढवणं उपयुक्त ठरू शकतं. डॉक्टरांच्या मते, प्रत्येक २० किलो वजनासाठी किमान १ लिटर पाणी पिणं गरजेचं आहे. म्हणजेच, जर एखाद्याचं वजन ६० किलो असेल, तर त्याने दिवसाला किमान ३ लिटर पाणी प्यावं. याचबरोबर, एकाच वेळी खूप पाणी पिणं शरीरासाठी हानिकारक ठरू शकतं. त्यामुळे पाणी दिवसभर थोड्या-थोड्या प्रमाणात, संतुलित पद्धतीने प्यावं. यामुळे शरीर हायड्रेट राहील आणि चयापचय क्रियाही योग्य रीतीने सुरू राहील, ज्यामुळे वजन कमी करण्यास मदत होईल.

**रिकाम्या पोटी आणि जेवणापूर्वी पाणी पिण्याचे फायदे...**

सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी एक ते दोन ग्लास कोमट पाणी पिण्याने शरीर डिटॉक्स होते आणि चयापचय क्रियेचा वेगही वाढतो. या सवयीमुळे शरीरातील साठलेले विषारी घटक बाहेर टाकले जातात आणि दिवसाची सुरुवात फ्रेश होते. जेवणाच्या सुमारे ३० मिनिटे आधी पाणी प्यायल्यास भूक थोडी कमी होते, ज्यामुळे अति खाण्याची शक्यता कमी होते. यामुळे एकूण कॅलरीचे प्रमाण नियंत्रित राहतं आणि वजन वाढण्यावर नियंत्रण मिळवता येतं. ही एक सोपी, नैसर्गिक आणि परिणामकारक पद्धत असून ती नियमितपणे फॉलो केल्यास दीर्घकालीन फायदे मिळू शकतात.

**गरम पाणी पिणे जास्त फायदेशीर आहे का?**

वजन कमी करण्यासाठी थंड पाणी प्यावं की गरम? हा प्रश्न अनेकांना सतावतो. खरंतर, कोमट पाणी हे वजन कमी करण्याच्या दृष्टीने अधिक फायदेशीर ठरते. कोमट पाणी शरीरात साचलेली चरबी विरघळवण्यास मदत करते, चयापचय क्रिया सुधारते आणि पचन क्रिया अधिक सुरळीतपणे चालण्यास मदत करते. विशेषतः जेवल्यानंतर कोमट पाणी प्यायल्यास अन्न सहज पचते, पोटफुगी, गॅस कमी होते आणि पोट हलकं वाटतं. यामुळेच वजन कमी करताना कोमट पाणी पिण्याची सवय अतिशय फायदेशीर ठरु शकते. वजन कमी करण्यासाठी पाणी पिताना आपण त्यात लिंबू, पुदिना किंवा काकडी घालून नैसर्गिक स्वाद वाढवू शकता, यामुळे पाण्याची चव तर सुधारतेच, शिवाय शरीर डिटॉक्स होण्यासही मदत होते. वजन कमी करण्याच्या आणि एकूण आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने ही सवय फायदेशीर ठरते.

## नयना कडू यांचे भावनिक आवाहन...




पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नैना कडू गहिवरल्या. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळेचे धन्यवाद मानून एक बहीण म्हणून त्यांना आवाहन केले. यावेळी त्या म्हणाल्या की, काही गोष्टी शासनाच्या कानी जाव्यात काल झालेल्या विमान दुर्घटनेने करोडोची लोकसंख्या असलेला हा देश मनापासून हादरला, तसा तो शेतकऱ्याच्या आत्महत्येने देखील मनापासून हादरला पाहिजे. हे अतिशय आवश्यक आहे बच्चू कडू वारंवार आंदोलन करतात हे शासनाला माहिती आहे. मागण्या मान्य नसेल तर तुम्ही पुन्हा आंदोलनाला बसू शकता असे पालकमंत्री म्हणाले. पण बावनकुळे यांनी एक लक्षात घ्यावे आंदोलन करतांना कोणतेही आंदोलन सोपे नसते माननीय मुख्यमंत्र्यांनी एक दिवस उपवास करावा, आणि मग आमच्या अमृता वहिनीची काय स्थिती होते हे पहावे. कोणताही पक्ष सत्तेत गेल्यावर सर्वांनी एकत्र बसावे. मायबाप शेतकऱ्यांसाठी पूर्णतः एकदा नियोजन आखावे. प्रत्येक शेतकऱ्याला आनंदाने जगता यावे असे नियोजन कोणत्याही भारतीय पक्षाला राहिली नाही का? असा प्रश्न पडतो. सर्व राजकीय पक्षाला सर्वसामान्य माणसाच्या वतीने विनंती आहे एकदा काहीतरी शेतीचे नियोजन ठरवावे. बच्चू कडू पाचव्यांदा अन्नत्याग आंदोलन करीत आहे. त्यांना काही सूडावर देण्यासाठी त्यांच्या आईने जन्म दिला का? जो कोणी आंदोलक आंदोलन करतो त्याचा परिवार त्याचे कार्यकर्ते तुटतात. शासनाने स्वतःची गेंड्याची कातडी बाजूला काढून सर्वपक्षीयांनी जातपात, स्वार्थ दूर ठेवावा, कधीतरी या मातीतल्या माणसासाठी नियोजन करावे. त्याची अंमलबजावणी करावी ही विनंती. खबरदार यापुढे बच्चू कडू ला अन्नत्याग आंदोलन करायला कुणी फशी पाडले तर लक्षात ठेवा प्रहारचा कार्यकर्ता संपूर्ण मंत्रिमंडळाला अन्नत्याग करायला लावेल.. हा प्रहारच्या वतीने शब्द आहे, असे नयना कडू म्हणाल्या.

## अंजनगाव सुर्जी बसस्थानकात ६ लाख १९ हजाराचे दागिणे लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती**

लग्नाकरिता जात असलेल्या महिलेच्या पर्समधून अज्ञात चोरट्याने तब्बल ६ लाख १९ हजार रुपये किंमतीचे दागीने चोरुन नेले. अंजनगाव सुर्जीच्या नवीन बसस्थानकावर ६ जुनला ही घटना घडली. पोलिसांनी १२ जूनला याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. चिंचोली रहिमापूर येथील रहिवासी प्रितीदेशमुख (३०) याचांदुरबाजारला भावाच्या लग्नाला जाण्याकरिता अंजनगाव सुर्जीच्या नवीन बसस्थानकावर आल्या होत्या. ग्राम पांढरीजवळ तिकिट काढण्यासाठी पर्स उघडली असता, सोन्याची पोथ (४० ग्रॅम), सोन्याचा गोफ (१५ ग्रॅम), तीन कानातले जोड (१० ग्रॅम), सोन्याच्यादान अंगठया (३ ग्रॅम), दोनसोन्याचेलहानकानातले जोड असाएकूण ६ लाख १९ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरीला गेल्याचे दिसले. महिलेने बस कंडक्टरला हे सांगितले, असता त्यांनी बस पथ्रोट पोलिस स्टेशनला नेली. तेथेही संपूर्ण तपासणी करण्यात आली. मात्र दागीने दिसून आले नाही. त्यामुळे महिलेच्या तक्रारीवरुन अंजनगाव सुर्जी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

## शुद्ध बियाणे, समृद्ध शेती; - काय काळजी घ्यायला हवी ?यंदा पावसाळ्याची सुरुवात लवकर: खरीप हंगामातील पेरणीची शेतकऱ्यांकडून तयारी सुरु

### पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीत खरीपातही भुईमूग लागवड शक्य; कसे कराल व्यवस्थापन?

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक कृषि**

कोकणातील जांभ्या जमिनीमध्ये खरीप हंगामात भुईमूगापासून चांगले उत्पादन मिळविता येते. शक्यतो मध्यम ते भारी व पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन लागवडीसाठी निवडावी.

**आवश्यक जमीन व पूर्वमशागत**

जमीन खोल नांगरून भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीपूर्वी हेक्टरी पाच टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट मातीत मिसळून द्यावे.

**वाणांची निवड**

भुईमूगाची लागवड करताना सुधारित जातींचा वापर करावा. विद्यापीठाने कोकण गौरव, कोकण ट्रॉम्बे टपोरा, कोकण भूरत्न या जाती विकसित करून प्रसारित केल्या आहेत.

कोकणामध्ये या जाती खरीप, रब्बी, उन्हाळी हंगामासाठी लागवडीकरिता योग्य आहेत.

**बीजप्रक्रिया**

उत्तम आणि दर्जेदार बियाणे हेक्टरी १०० ते १२५ किलो वापरावे. मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी बियाण्याला थायरम ३ ग्रॅम या प्रमाणात चोळावे.

या व्यतिरिक्त २० ग्रॅम रायझोबियम आणि ५० ग्रॅम स्फुरद विरघळवणाऱ्या जीवाणू संवर्धनाची प्रती किलोग्रॅम बियाण्यास प्रमाणे बीजप्रक्रि लागवड कशी करावी?

पेरणीपूर्वी जमीन सपाट करून घ्यावी. आवश्यकता वाटल्यास पाण्याची एक पाळी द्यावी.

पेरणी टोकन पद्धतीने करावी.

उपट्या जातीची पेरणी दोन ओळीत ३० सेंटीमीटर अंतर ठेवून करावी.

निमपसऱ्या व पसऱ्या जातीसाठी दोन ओळीतील अंतर ४५ सेंटीमीटर ठेवावे.

दोन रोपांतील अंतर १० ते १५ सेंटीमीटर ठेवावे.

खरीप हंगामातील पेरणी १० ते २० जूनपर्यंत करावी.

**प्लास्टिक आच्छादन पद्धती**

कोकण विभागात भुईमूगापासून अधिक उत्पादन आणि नफा मिळविण्यासाठी पिकाची लागवड रुंद वाफा व सरीवर ८० सेंटीमीटर बाय २० सेंटीमीटर अंतरावर करून ७ मायक्रॉन जाडीचे पारदर्शक प्लास्टिक आच्छादन करावे.

आर्थिक नफा मिळविण्यासाठी खत व्यवस्थापन, तण नियंत्रण, पीक संरक्षण याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.

**खत व्यवस्थापन**

पेरणीच्या वेळी खतांच्या पूर्ण मात्रा द्याव्यात. हेक्टरी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद, बोरोनेटेड सुपर फॉस्फेट स्वरूपात व ३० किलो पालाश द्यावे.

**आच्छादनाचे फायदे**

प्लास्टिक आच्छादनामुळे जमिनीतील तापमान (५० ते ८० ग्रॅम) वाढते.

त्यामुळे थंडीच्या कालावधीत भुईमुगाची उगवण ३ ते ४ दिवस लवकर होते.


जमिनीतून होणारे बाष्पीभवन रोखले जाते.

त्यामुळे पिकाला पाणी कमी लागते व पाण्याची बचत होते.

जमिनीतील उपयुक्त जीवाणूंमध्ये वाढ होऊन त्याची कार्यक्षमता वाढते.

भुईमूगाची वाढ जोमाने झाल्याने रोगांचे प्रमाण कमी होते.या करावी.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

## शेतकऱ्यांनो पेरणी करतानां शुद्ध बियाण्यांचा वापर करा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती**

सर्वत्र पावसाळ्याची चाहूल लागताच खरीप हंगामाची तयारी जोरात सुरू झाली आहे. यंदा चांगले उत्पादन घेण्यासाठी शेतकरी दर्जेदार बियाणे घेण्याकडे लक्ष देत आहेत. मात्र, याच काळात बनावट बियाण्यांचा धोका अधिक असतो. त्यामुळेच शेतकऱ्यांनी योग्य खबरदारी घेऊनच बियाणांची निवड करावी, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

यावर्षी पावसाळ्याची सुरुवात उन्हाळ्यातच लवकरच झाली असल्याने जिल्ह्यात सर्वत्र बळीराजाकडून खरीप हंगामातील पेरणीची लगबग सुरू आहे. यासाठी पिकांची चांगली वाढ आणि चांगले उत्पादन घेण्यासाठी दर्जेदार बियाणे खरेदी करणे आवश्यक असते. शुद्ध बियाणे घेण्यासाठी, तसेच वियाण्यांतील फसवणूक टाळण्यासाठीशेतकऱ्यांनी काळजी घ्यावी लागते. शुद्ध बियाणे हे समृद्ध शेतीसाठी फायदेशीर ठरते.



'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या संत तुकाराम महाराजांच्या म्हणीप्रमाणे समृद्ध शेतीसाठी बियाणांचे महत्त्व हे पूर्वीपासून अधोरेखित आहे. चांगले बियाणे वापरले तर शेती उत्पन्नात २० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी शुद्ध बियाण्यांचा वापर करावा. शुद्ध बियाणे वापरल्यामुळे बुरशीजन्य रोग व पिकास होणाऱ्या किडीपासूनही मोठे संरक्षण मिळते, असे कृषितज्ज्ञ सांगतात.

**बियाणांची पॅकेजिंग कशी तपासणार?**

पिशवीवर कंपनीचे नाव, परवाना क्रमांक, उत्पादन आणि वापरपूर्व तारीख, बॅच नंबर आणि प्रमाणपत्र, अंकुरण क्षमता, ओलावा टक्केवारीची माहिती, आयएसआयचा उल्लेख असल्यास अधिक विश्वासार्ह आहे.

**बियाणे खरेदीत फसवणूक झाल्यास?**

खरेदीच्या पावतीची प्रत ठेवा, पिशवीतील नमुना सुरक्षित ठेवा, बियाणे वापरून झाल्यावर परिणामाची नोंद ठेवा, फसवणुकीसंदर्भात लेखी तक्रार कृषी कार्यालयाकडे करणे गरजेचे

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १४ जून २०२५ शहर/ग्रामिण


# सरकारच्या उदासीन धोरणामुळेच शेतकरी व्हेंटिलेटरवर - तुपकर

## पापळ येथून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आंदोलनाची सुरुवात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४नांदगाव खंडेश्वर**

क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठीच्या आंदोलनास नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील पापळ या गावात आयोजित एल्गार परिषदेतून सुरुवात झाली. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यावर याच ठिकाणी एल्गार सभेला प्रारंभ झाला. या वेळी हजारोंच्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

रविकांत तुपकर यांनी सरकारच्या शेतकऱ्यांबद्दलच्या धोरणावर तीव्र हल्लाबोल करताना शेतकरी व्हेंटिलेटरवर असल्याचे सभेला संबोधित करताना म्हटले. राज्यातील शेतकरी आज मरणाच्या दारात उभा आहे. खुद्द एका मंत्र्यांनीही विधानसभेत हे मान्य केले आहे. मात्र, सरकार शेतकऱ्यांचे अस्तित्व संपवण्याच्या दिशेने इंग्रजांप्रमाणे दादागिरी आणि दहशतीचे राजकारण करत आहे. शेवटच्या श्वासापर्यंत कर्जमाफीचा लढा चालू ठेवू. राज्यभर कर्जमाफीचा एल्गार उभा करून सरकारला झुकवू, असे ठामपणे जाहीर करून तुपकर यांनी शेतकऱ्यांच्या मुलांनीही या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले.याप्रसंगी शेतकऱ्यांनी एकजुटीचा निर्धार व्यक्त केला. यासाठी सर्वपक्षीय पाठिंबा मिळाला आहे. या सभेला क्रांतिकारी शेतकरी संघटनेसह विविध पक्षांच्या नेत्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. या सभेला क्रांतिकारी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजकुमार कसबे, लक्ष्मण मोरे, गजानन सावरखे, किरण ठाकरे, सागर दुधाने, नामदेव पतंगे, चंद्रशेखर गवळी, कपिल पडघन, छोटू मुंदे, विष्णू तिरमारे, शरद बोदडे, विजय अजबले, रमाकांत मुरादे, राजू राऊत, तसेच शेतकरी संघटनेचे सीताराम कंटाळे उपस्थित होते. तुपकर व प्रहारचे बच्चू कडू यांच्या आंदोलनात आम्ही सर्वजण सामील असून, वेळ आल्यास रस्त्यावर उतरून सरकारला उत्तर देऊ, असे या वेळी उपस्थित सर्व वक्त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. या सभेचे सूत्रसंचालन संतोष सुरजुसे यांनी केले. सभेला नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती.

संपूर्ण कर्जमाफी करा अन्यथा राज्यभरात आंदोलन या एल्गार परिषदेत शेतकऱ्यांच्या हितार्थ काही प्रमुख मागण्या करण्यात आल्या. त्यामध्ये विधानसभा निवडणुकीच्या आधी राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार त्वरित संपूर्ण शेतकरी कर्जमाफी करावी, अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी, सरसकट पीक विमा लागू करावा, सोयाबीन व कपाशी पिकांना हमीभाव द्यावा या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे. यासह काही पूरक मागण्याही केल्या आहेत. या मागण्यांची पूर्तता शासनाने केली नाही तर राज्यभरात मोठ्या प्रमाणात आंदोलन उभारले जाणार आहे.

## अमरावती सायकलिंग असोसिएशन तर्फे आयोजन : १८ जून पासून पंढरपूर सायकलवारी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

अमरावती सायकलिग असोसिएशनची संघटना अमरावती मध्ये नेहमीच सायकलिगचे महत्त्व वाढविण्यासाठी व नागरिकांमध्ये सायकलिगची आवड निर्माण व्हावी या हेतूने विविध उपक्रम राबवित असते. याच अनुषंगाने ही संघटना वर्षभर विविध सायकलिग चॅलेंजचे आयोजन राष्ट्रीय स्तरावर करत असते. या स्पर्धांना नेहमीच देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसादमिळतो. यावर्षी अमरावती सायकलिग असोसिएशन तर्फे पंढरपूर सायकल वारी चे आयोजन करण्यात आलेले आहे. पंढरपूर येथे आयोजित चतुर्थ अखिल महाराष्ट्र पंढरपूर सायकल वारी व सम्मेलन२०२५ मध्ये संपुर्ण महाराष्ट्रातून ३००० ते ४००० सायकल स्वार असोसिएशनचे ३८ सायकलस्वार व ४ सहकारीसदस्य येथूनवारीकरिता जात आहेत. शुभारंभ १८ जूनला संकाळी ६.०० वाजता एकविरा देवी मंदिरचे प्रांगण येथून होणार आहे. सायकलवारी करिता ५५० कीमी अंतर पार करायचे असून वारीचा मार्ग बुधवार दि. १८ जून अमरावतीवरून कारंजा, मंगरुळपीर, वाशिमला पहिल्या दिवसाचा मुक्कामानंतर हिगोली, ओंढा नागनाथ, जवळा बाजार वरून परभणीलादुसऱ्या दिवसाचा मुक्काम त्यानंतर तिसऱ्या दिवशी गंगाखेड, परळी वैज्यनाथ वरून कळंब ला मुक्काम. चौथा दिवस २१ जूनला कळवं वरून येरमाळा, बार्शी, कुरुडवाडी वरून अढीव येथे मुक्काम. रविवार दि. २२ जून २०२५ रोजी पंढरपूर येथे आयोजित चतुर्थ अखिल महाराष्ट्र पंढरपूर सायकल वारी व सम्मेलन २०२५ मध्ये सहभाग नोंदवणार आहे. यावर्षीचे यजमान पद लातूर सायकलिग असोसिएशन यांच्याकडे आहे. पंढरपूर येथे होणारा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे. सकाळी ६.०० वाजता सायकलनी नगर प्रदक्षिणा, विठ्ठल रुख्मिणी निवास येथून सुरू होणार, तदनंतर सकाळी ७.०० रेल्वे ग्राऊंड वर सर्व समाविष्ट सायकल वारकऱ्यांचे अभूतपूर्व सायकल रिंगण सोहळा संपन्न होणार. या वारीत खालील सदस्य सहभागी होणार आहे. लक्ष्मीकांत खंडागळे, नितिन अंबारे, नितिनबोरगावकर, राजेंद्र महाजन, शालिनी महाजन रामरावजी उईके, नरेंद्र भटकर, राजू धोटे, विनोद निशितकर, सचिन जयस्वाल, किशोर शिरभाते, नरेंद्र कुरळकर, अतुल कळमकर, डॉ. देवेंद्र चौधरी, वर्षा सदार, शालिनी सेवानि, विनोद वानखडे, दिव्या मेश्राम, धनराज मेश्राम, विक्रांत खेरडे, पवनकुमार रामावत, प्रविण कोहळे, सृजल कोहळे, देवानन्द हिरकणे, जयमाला देशमुख, विजय महल्ले, केशव निकम, संतोष सरोदे, विजय गुडधे, सुभाष गुप्ता, रुषीकेश इंगोले, हर्ष भारुका, श्रीराम देशपांडे, महेश गट्टाणी, दिनेश नरसू, सचिन काळे, वैभव दलाल. सहकारी सदस्य राजूभाऊ देशमुख, विकास केमदेव, आशीष बोरकर, महेंद्र जडे हे राहणार आहे.

# एटीएम नाही? आता पोस्टमनला बोलवायचं; आधार, अंगठा देऊन पैशाचं बंडल घ्यायचं

## टपाल विभागाची योजना ; सर्वसामान्यांना मिळाला मोठा दिलासा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

एटीएम नसलेल्या ठिकाणी,खेड्यापाड्यात निराधार, वयोवृद्ध, दिव्यांगांना बँक खात्यातून रोख काढण्यासाठी पोस्टाकडून ॲप्लिकेशनच्या साहाय्याने आधार कार्डशी संलग्न खात्यातील रक्कम काढण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे.

याबाबत अधिक माहिती पाहिजे असल्यास जवळच्या पोस्ट खात्याशी संपर्क साधावा. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांना यामुळे मोठी सुविधा झाली आहे. पोस्टाच्या विविध सुविधेसोबतच आता या सुविधेमुळे ग्रामीण नागरिकांना बँकेमध्ये चकरा मारण्याची गरज भासणार नाही.यामध्ये वेळ आणि पैशाची बचत होणार आहे. बँक खात्यातून रोख काढण्यासाठी पोस्टाकडूनॲप्लिकेशनच्या साहाय्याने आधार कार्डशी संलग्न खात्यातील रक्कम काढण्याची सुविधा विनामूल्य उपलब्ध करून दिली जात आहे.पोस्टाचे आयपीपीबी खाते असेल तर त्यावरून घरपोच सुविधेचा लाभ घेता येऊ शकतो.पोस्टाने घरपोच बँकिंग सुविधा सुरू केली आहे. ॲप्लिकेशनवर नोंदणी केल्यानंतर पोस्टाचा कर्मचारी घरी येऊन बँकिंग व्यवहार पूर्ण करेल. यासाठी आधार कार्ड पोस्टमनकडे देऊन स्कॅन करून व्यवहार पूर्ण करेल.

### आता ताटकळत उभं राहण्याची गरज नाही

अनेक गावांत एटीएम सुविधा नसल्याने बैंकिंग व्यवहार करण्यासाठी ग्राहकांना तालुका स्तरावर जावे लागते. पोस्ट कार्यालयाने आता 'डोअरस्टेप बँकिंग सेवा' सुरू केली असल्याने खेड्यापाड्यात ग्राहकाला पोस्टात जाऊन रांग लावण्याची गरज राहणार नाही.

'इंडिया पोस्ट'ची 'डोअरस्टेप बँकिंग' सेवाया सेवेंतर्गत, पोस्ट ऑफिसमधील कर्मचारी घरी येऊन बँकिंगशी संबंधित व्यवहार पूर्ण करतात. या सेवेमुळे बँक शाखेत जाण्याची गरज भासत नाही.

# अखेर चर्चांना विराम, २०१७ च्या प्रभाग रचनेप्रमाणे कार्यक्रम

## अमरावती जिल्हा परिषदेचे ५९ तर पंचायत समितीचे ११८ गण निश्चित १४ जुलै ते १८ ऑगस्ट दरम्यान प्रभागरचना कार्यक्रम जाहिर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

मिनी मंत्रालय असलेल्या अमरावती जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांच्या प्रक्रियेला सुद्धा आता वेग आला आहे. राज्य शासनाने आगामी स्थानिक निवडणुकांबाबत आदेश जारी केल्यानंतर स्थानिक यंत्रणा कामाला लागली आहे. कोर्टाच्या आदेशान्वये २०१७ साली निश्चित करण्यात आलेल्या प्रभाग रचनेनुसारच यंदाच्या जिल्हा परीषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका होणार आहे. त्यामुळेजिल्हा परिषदेचे २०१७प्रमाणे ५९ सर्कल आणिपंचायत समितीचे ११८ गण कायम राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.जिल्हा परिषदसह १४ पंचायत समित्यांमध्ये सद्या प्रशासक आहे. तब्बल साडेतीन वर्षांपासून या स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या निवडणुकीच्या प्रतिक्षेत राजकीय पदाधिकारी होते. सदर प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना मागील महिन्यांत न्यायालयाने सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्यानिवडणुकाचार महिन्यांच्या आत लावण्याचे आदेशआणि शासन कामाला लागले. परंतु सन २०२२ मध्ये जिल्हा परिषदेने केलेल्या प्रभाग चनेत सदस्य संख्या ५९ वरुन ६६ तर चायत समित्यांच्या गणाची संख्या ११८वरून १३२ केली होती. त्यामुळे नेमके कोणत्या संख्येनुसार निवडणुका होणार हा संभ्रम गावपुढाऱ्यांध्ये कायम होता. परंतु गुरुवारीशासनाच्या आदेशाने चित्र स्पष्ट झाले आहे. आता शासनाने २०१७ मधील प्रभाग रचना कायम ठेवत निवडणूक कार्यक्रमास मंजुरी दिली आहे. या निर्णयानंतर प्रशासनाने निवडणूक पूर्व कामकाज सुरू केले असून १४ जुलैपासून ते १८ ऑगस्टदरम्यान प्रभाग रचना कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या कालावधीत जनतेकडून सूचना, हरकती स्वीकारल्या जातील आणि त्यावर सुनावणी होणार आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद व पचायत समितीनिवडणुकालवकरच जाहीर होण्याची शक्यता असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पुनर्रचनेसाठी हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. प्रशासनाने संबंधित अधिकाऱ्यांना तयारीचे आदेश दिले असून लवकरच निवडणूक प्रक्रियेस गती मिळेल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

### चांदूर रेल्वेत गण घटला तर अचलपूरमध्ये वाढ

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची सरासरी सदस्य संख्या कायम राहणार असली तरी लोकसंख्येच्या प्रमाणात चांदूर रेल्वे पंचायत समिती सर्कलमध्ये तीन गण असताना तेथे एक कमी झाल्याने दोनच गण राहणार आहे. अचलपूर पंचायत समितीमध्ये ५ गण असताना येथे एक गण वाढून सहा गण झाले आहे.

प्रभाग रचना कार्यक्रम१४ जुलै रोजी प्रभाग रचनेची अधिसूचना जाहीर होईल. २१ जुलै रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर करणे, २७ जुलै रोजी जिल्हाधिकार कार्यालयातून हरकतीच्या आधारावर अभिप्राय सादर करणार आहे. ११ ऑगस्ट रोजी प्राप्त अभिप्राय व हरकतींवर सुनावणी, २८ ऑगस्ट रोजी अंतिम प्रभाग रचना मान्यतेसाठी आयोगाकडे सादर केली जाणार आहे.




# अमरावती-मुंबई विमान उड्डाण रद्द : तांत्रिक कारणामुळे अलायन्स एअरचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**




शुक्रवारी अलायन्स एअरचे मुंबई-अमरावती-मुंबई विमान अमरावती विमानतळावर उतरले नाही आणि उड्डाणही करू शकले नाही. तांत्रिक कारणांमुळे शुक्रवारी दोन्ही बाजूंच्या उड्डाणे रद्द करण्यात आली, अशी माहिती अलायन्स एअरने दिली.प्राप्त माहितीनुसार शुक्रवारी मुंबईहून अमरावतीला येणारे विमान आणि अमरावतीहून मुंबईला जाणारे विमानतांत्रिक कारणांमुळे अलायन्स एअरने रद्द केले होते. तथापि, अलायन्स एअरने याबद्दल पूर्व माहिती दिली होती. त्यामुळे मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांना पर्यायी मार्गांनी मुंबईला जावे लागले. उल्लेखनीय असे आहे की, मे महिन्याच्या सुरुवातीला विमानात इंधन भरण्यात अडचणी आल्यामुळे अमरावती ते मुंबई हे विमान रद्द करण्यात आले होते.

# पुरवठा अधिकाऱ्यांच्या कृपेने..... वरूडमध्ये खुल्या बाजारात शासकीय धान्याची विक्री



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४वरुड**

पुरवठा अधिकारी व स्वस्त धान्य दुकानदारांच्या संगणमताने वरुड शहरासह संपूर्ण तालुक्यात शासकीय धान्याचा काळा बाजार सुरू असतांना यावर कार्यवाही करून हा काळा बाजार त्वरीत बंद करण्याची मागणी सर्वसामान्य नागरिकांनी जिल्हा पुरवठा अधिकारी अमरावती यांचेकडे केली आहे. मात्र गेंड्याच्या प्रशासनातील कातडीचे अधिकारी कार्यवाही करतील, याबाबत जनतेच्या मनात संभ्रम दिसुन येत आहे.

शासनाकडून दर महिन्याला स्वस्त धान्य दुकानदारांना शासकीय धान्याचा पुरवठा केला जातो. मात्र विविध मार्गाने हे शासकीय तांदूळ शिल्लक पाडून अनेक स्वस्त धान्य दुकानदार याची खुल्या बाजारात विक्री करतात आणि हा सर्व प्रकार पुरवठा अधिकारी व स्वस्त धान्यदुकानदारांच्या संगनमताने होत आहे. वास्तवीक पाहता तहसील कार्यालयात पुरवठा अधिकारी केवळ खुर्चीवर बसुनच सर्व तालुक्याचा कार्यभार सांभाळतात. कधीच स्वस्त धान्य दुकानांची तपासणी करीत नाही. यामुळे अनेक स्वस्त धान्य दुकानदार याचा नेमका फायदा घेत विविध मार्गांनी शासकीय धान्य शिल्लक पाडून ते धान्य खुल्या बाजारात मोठ्या दराने विक्री करतात. यामुळे लाभार्थी सुद्धा शासकीय धान्य याचप्रमाणे खुल्या बाजारात मोठया दराने विक्री करतात. अशा परिस्थितीत ज्यांचेवर तालुक्याची जबाबदारी आहे तेच अधिकारी भ्रष्ट असतील तर सर्वसामान्य नागरिकांनी न्याय मागावा तरी कोणाकडे, यामुळे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन शासकीय धान्याची खुल्या बाजारातील विक्री बंद करून याबाबत दोषी संबंधीत अधिकारी, स्वस्त धान्य दुकानदार व लाभार्थी यांचेविरुद्ध कठोर कार्यवाही करण्याची मागणी मोठया प्रमाणात होत आहे.

# मध्यवर्ती कारागृहातील खळबळजनक घटना खुल्या कारागृहातून मध्यप्रदेशचा कैदी फरार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती**

अमरावतीच्या मध्यवर्ती कारागृहातून एका कैद्याने पलायन केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. १८ कैद्यांना बाग कामासाठी खुल्या कारागृहात आणले असता, या संधीचा फायदा घेऊन कैद्याने पलायन केले. हा कैदी मध्यप्रदेशच्या खरगोन जिल्ह्यातील असल्याची माहिती आहे. गुरुवारी (१२ जून) दुपारी ३ वाजताच्या दरम्यान कारागृहातील १८ कैद्यांना बागकामसाठी मेन गेटच्या बाहेर आणण्यात आले होते. त्यानंतर ३-४५ वाजता सर्व कै द्यांना एकत्र जमा केले असता, शिक्षाबंदी सी /१८० बद्री रिच्छु मुजादे (वय ३२ रा भिकनगाव, खरगोन, मध्यप्रदेश) हा कैदी दिसून आला नाही. लघवीला जातो असे सांगून तो गेला होता. त्याचा आजुबाजुला, परिसरात शोध घेण्यात आला, पण आढळला नाही. हा आरोपी जन्मठेपेची शिक्षा भोगत होता. मध्यवर्ती कारागृहातील कर्मचारी संजय मोहोड यांनी यासंदर्भात फ्रेजरपुरा पोलिसांकडे तक्रार दिली. यावरुन पोलिसांनी फरार झालेल्या कैद्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.




# १ सप्टेंबरपर्यंत प्रसिद्ध होणार अंतिम प्रभाग रचना

## वेळापत्रक जाहीर, नियोजनबद्ध कार्यक्रम आखण्याची सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा प्रयत्न निवडणूक आयोगाकडून केला जात आहे. त्यानुसार राज्य सरकारला प्रभाग रचना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यासाठी आता निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व महापालिका, नगर परिषद आणि नगरपंचायतयांच्या प्रमुखांना नियोजनबद्ध कार्यक्रम आखून प्रभागाची रचना करण्याचे आदेश दिले आहेत. यानुसार अमरावती महापालिकेत १ सप्टेंबरपर्यंत अंतिम प्रभाग रचना घोषित करण्यात येणार आहे.

या नियोजनबद्ध कार्यक्रमाच्या तारखा देखील जाहीर करण्यात आल्या असून, त्या कालावधीत सर्व शासकीय अधिकाऱ्यांना ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. अमरावती महापालिका ही ड वर्ग दर्जाची आहे. या महानगरपालिकेच्या प्रभाग रचनेकरीता वेळापत्रक गुरुवारला सकाळी महापालिकेत प्राप्त झाले आहे.



### असा आहे कार्यक्रम

प्रगणक गटाची मांडणी तसेच प्रारूप प्रभाग रचना
११ ते १६ जून
प्रारुपप्रभागरचनेत जनगणनेची माहिती तपासणे
१७ ते १८ जून
स्थळपाहणी : १९ ते २३ जून
गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे : २४ ते २६ जून
नकाशावर निश्चित प्रभाग जागेवर तपासणे : २७ ते ३० जून
प्रारूप प्रभाग रचनेच्या मसुद्यावर समितीच्या स्वाक्षऱ्या
१ ते ०३ जुलै
प्रारूप प्रभाग रचना निवडणूक आयोगास सादर करणे
४ ते ८ जुलै
प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे व हरकती सूचना मागविणे
१५ ते २१ जुल
प्राप्त हरकती, सूचनांवर सुनावणी : २२ ते ३१ जुलै
अंतिम प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाला पाठविणे
१ ते ७ ऑगस्ट

### आठ सदस्यीय समिती स्थापन

प्रभाग रचनेची टप्पानिहाय कार्यवाही करण्यासाठी मनपा आयुक्तांच्या अध्यक्षतेत एक समिती स्थापन करण्यात आली आहे.समितीत एकूण ८ सदस्य आहेत. या समितीला प्रभाग रचना प्रारुप, जनगणनेची माहिती, स्थळ पाहणी, नकाशे तयार करणे, प्रभाग हद्दी तपासणे आणि प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्याची जबाबदारी पार पाडावी लागणारआहे. मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या अध्यक्षतेत या समितीत नगर रचना अधिकारी, आयटी एक्सपर्ट अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, निवडणूक अधिकारी आदी ८ जणांचा समावेश आहे.

# चंद्रशेखर बावनकुळेंनी घेतली बच्चू कडूंची भेट

## मुख्यमंत्र्यांनी फोनवरून साधला संवाद, कर्जमाफीबाबत समिती स्थापन करण्याची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४गुरुकुंज मोझरी**

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी या प्रमुख मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते व माजी आमदार बच्चू कडू यांनी सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाचा आज सहावा दिवस आहे. तब्येत खालवलेली असतानाही बच्चू कडू आपल्या आंदोलनावर ठाम आहेत. दरम्यान, राज्याचे महसूल मंत्री व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज उपोषणस्थळी भेट देत बच्चू कडू यांची विचारपूस केली. यावेळी बावनकुळे यांनी बच्चू कडू यांच्या समोरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन लावला. मुख्यमंत्र्यांनी स्वत: फोनवरून बच्चू कडू यांच्याशी संवाद साधत कर्जमाफीबाबत मोठी घोषणा केली.

कर्जमाफीबाबत एक समिती गठीत करण्यात येईल. या समितीत बच्चू कडू यांना सहभागी करून घेणार असून, समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफीबाबत निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटल्याचे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.



### नेमके काय म्हणाले बावनकुळे?

बच्चू कडू यांच्या ज्या १७ मागण्या आहेत, त्यासाठी आम्ही बैठक घेऊ, या बैठकीला सर्व विभागाचे मंत्री उपस्थित राहतील, या बैठकीला बच्चू कडू यांची देखील उपस्थिती असेल, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणालेत. दिव्यांगांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत ते म्हणाले की, दिव्यांगांचे अनुदान देताना ते बजेटमध्ये आणावे लागते, त्यामुळे येणाऱ्या अधिवेशनात ते मांडण्यात येईल. त्यामध्ये किती वाढ करायची, ते मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री व बच्चू कडू ठरवतील.

### बच्चू कडू सरसकट कर्जमाफीसाठी आग्रही

दरम्यान शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर चर्चा झाली असता, मुख्यमंत्री म्हणाले की, कर्जदार शेतकऱ्यांची संपूर्ण माहिती घेऊन तो डेटा जमा केला जाईल व नंतर त्यावर तोडगा काढू. मात्र त्यानंतर लगेचच बच्चू कडू यांनी उपस्थित शेतकऱ्यांना हा निर्णय तुम्हाला मान्य आहे का? असे विचारले असता, त्यावर सर्वांनी आम्हाला हा निर्णय मान्य नसून, सरसकट कर्जमाफी व्हावी, अशी मागणी केली.

### नवीन कर्ज देण्यासाठी कॅबिनेटमध्ये चर्चा करू

कर्जमाफी होईपर्यंत नवीन कर्ज देण्यात यावे, असे बच्चू कडू म्हणाले. त्यावर कर्जमाफी होईपर्यंत नवीन कर्ज देण्यासाठी मी येणाऱ्या कॅबिनेटमध्ये चर्चा करेल व निर्णय घेऊ, असे आश्वासन बावनकुळे यांनी दिले. तरीही, बच्चू कडू आपल्या उपोषणावर ठाम आहेत. आम्ही यावर समाधानी नाही, आम्ही उपोषण मागे घेणार नाही, असे बच्चू कडू यांनी स्पष्ट केले आहे.

# भारत कृषक समाज युवक आघाडी जिल्हा अध्यक्षपदी डॉ.नितीन टाले यांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ नांदगाव खंडेश्वर**

भारताचे पहिले कृषिमंत्री व शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी स्थापन केलेल्या भारत कृषक समाज युवक आघाडीच्या अमरावती जिल्हाध्यक्षपदी सिनेट सदस्य व सामाजिक कार्यकर्ते डॉ. नितीन टाले यांची निवड करण्यात आली आहे.भारत कृषक समाज ही भारतातील आघाडीची निरपेक्ष शेतकरी संघटना असून जी शेतकरी समृद्धीसाठी तसेच आपल्या देशाला लाभदायक असलेल्या निरोगी, शाश्वत, समावेशक आणि समतापूर्ण अन्न प्रणालींसाठी काम करते. १९५५ साली डॉ. पंजाबराव देशमुख यांनी स्थापन केलेला भारत कृषक समाज हा एक असा मंच आहे आहे. जिथे अन्न प्रणाली मजबूत करण्यात रस असलेले प्रत्येकजण एकत्र येऊ शकतो आणि जमिनीतून अधिक उत्पादन घेणाऱ्यांना मदत करण्यासाठी त्यांची बुद्धिमत्ता, संसाधने आणि ऊर्जा चांगल्या प्रकारे वापरू शकतो. शेतकरी जगाला अन्न देतात आणि जगातील बहुतेक नैसर्गिक संसाधनांचे - माती, पाणी आणि ऊर्जा - जबाबदारीने व्यवस्थापन करतात. तरीही शेतकरी कुटुंबे सर्वात गरीब, सर्वात कुपोषित आणि हवामान बदलासाठी सर्वात असुरक्षित आहेत. भारत कृषक समाज शेती अनुभवावर आधारित प अन्न आणि कृषी धोरण याची शिफारसी करते, तसेच बहु-भागधारक संशोधन, भागीदारी आणि संवाद, कार्यशाळा आणि परिषदा यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन करीत बळीराजाच्या प्रगतीसाठी कार्य करते. समाजातील युवा शेतकऱ्यांना संघटित करून भारत कृषक समाजाचे कामकाज अधिक गतिमान करण्याकरिता सोबतच युवा शेतकऱ्यांना एकत्र करून कृषी धोरण राबविण्यासाठी युवक आघाडीचे गठन करण्यात आले आहे. डॉ. नितीन टाले हे नांदगाव खंडेश्वर येथील रहिवासी असून ते प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत . कृषी, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक ,राजकीय अशा विविध क्षेत्रात त्यांचे मोठे कार्य असून एक अभ्यासपूर्ण वक्ता म्हणून त्यांची जिल्ह्यात ख्याती आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे ते सिनेट सदस्य असून गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचे व त्यांच्या समस्या निकाली काढण्याचे मोठे काम ते करीत आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांची भारत कृषक समाजाच्या युवक आघाडीच्या अमरावती जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. भारत कृषक समाजाचे जिल्हाध्यक्ष सिनेट सदस्य भैय्यासाहेब मेटकर यांच्या हस्ते डॉ. नितीन टाले यांना नियुक्तीपत्र प्रदान करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी नारायणराव मानकर, मधुकरराव काळे, प्रा राजीव रिठे, दिलीपराव देशमुख, विनोदराव ठाकरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.डॉ. टाले यांनी आपल्या नियुक्तीबद्दल भारत कृषक समाज महाराष्ट्र अध्यक्ष प्रकाशराव मानकर , मार्गदर्शक दिलीपबाबू इंगोले, प्रा. डॉ. हेमंतराव देशमुख, प्रा. डॉ.हेमंतराव काळमेघ, भारत कृषक समाज जिल्हाध्यक्ष प्रा. भैय्यासाहेब मेटकर, नरेशभाऊ पाटील, , नारायणराव मानकर,भैय्यासाहेब वानखडे, दिलीपराव देशमुख, मधुकरराव काळे, प्रा. राजीव रिठे, विनोदराव ठाकरे, प्रा. राजेश गांजरे,अक्षय इंगोले, दीपक उतखेडे, सुरेश आडे, अजय लेंडे, प्रकाशराव कोरपे, डॉ. कुमार बोबडे, अमोल इंगोले, सौरभ घोगरे यांचे आभार मानले आहे.



### युवा शेतकऱ्यांना एकत्र कृषी आधारित उपक्रम राबविणार

कधी नव्हे एवढी विदारक परिस्थिती आज शेतकऱ्यांची आहे. दर आठ तासाला एक शेतकरी आत्महत्या करीत आहे. देशातील सर्वात जास्त आत्महत्या करणाऱ्या जिल्ह्यांपैकी अमरावती जिल्हा आहे. युवा शेतकऱ्यांना एकत्र करून कृषी धोरणावर प्रभाव टाकणे, शेतकऱ्यांना पाठबळ व प्रोत्साहन देण्याकरिता विविध उपक्रमांचे आयोजन. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना मदतीकरता हेल्पलाइन. शेतकरी समुपदेशन केंद्र अशा उपक्रमांचे नियोजन करण्याचा मानस भारत कृषक समाज युवक आघाडीचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष डॉ नितीन टाले यांनी व्यक्त केला.

# सायन्सकोर मैदानात २० जुन ते २९ जुन २०२५ दरम्यान पालकमंत्री महोत्सव




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

अमरावती जिल्हयाची संस्कृती व परंपरा जोपासत अमरावतीकरांना विविध प्रदर्शनीचा व सांस्कृतीक कार्यक्रमाचा भरघोष आनंद घेता यावा. याकरीता सांयस्कोर मैदान, बस स्टॉप जवळ, अमरावती येथे भारतीय जनता पार्टी - युवा स्वाभिमान पार्टी व शांती इव्हेंन्टच्या यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२० जुन ते २९ जुन २०२५ रोजी पर्यत पालकमंत्री अमरावती महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या महोत्सवामध्ये हातमाग, हस्तशिल्पक, सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार, सांस्कृतीक कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

याच कार्यक्रमाच्या पेंडॉलचे भुमीपुजन युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक सुनिल राणा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजकांच्यावतीने सांगीतले की, अमरावती पालकमंत्री महोत्सवात अमरावतीकरांसाठी विविध प्रदर्शनी सोबतच धमाकेदार लावणी नृत्य स्पर्धा सुध्दा ठेवण्यात आली असून अप्सरा आली या बहारदार लावणीचा नजरांना सुध्दा अमरावतीकरांसाठी असणार आहे. तसेच लहान मुलांचा फॅशन शो, गित गायन, संगीत, नृत्य,लावणी तसेच फॅशन शो सोबत इतरही सांस्कृतीक शो चा आनंद अमरावतीकरांना घेता येणार असल्याचे शांती इव्हेंटचे संचालक सत्यजीत सावंत यांनी सांगीतले आहे. अशा या अमरावती पालकमंत्री महोत्सवामध्ये हजारो अमरावतीकरांनी सहभाग घेवुन आनंद घेण्याचे आवाहन यावेळी केले आहे.भुमीपुजन प्रसंगी सुनिल राणा, मा.नगरसेविका सुमती ढोके, मा.नगरसेवक आशिष गावंडे, वंदना जामनेकर, अविनाश काळे, सत्यजित सावंत, डॉ.हरीराम भांडे, सारीका अवघड, महेश किल्लेकर, संजय गायकवाड, राजु रॉय, गौतम हिंरे, सद्दाम हुसैन, वर्षा पाटने, सुनिता उईके, शोभा पकाश सावंत, नम्रता सत्यजित सावंत, सुधिर लवणकर, राजेश दातखोरे, सत्यजीत सावंत, अजय बोबडे, आनंद भोयर, राहुल काळे, मनोज ढवळे आदि उपस्थित होते.

# नागरिकांना महानगरपालिकेच्या मालमत्ता कर बिलाचे वाटप : नागरिकांनी मालमत्ता कर भरुन महानगरपालिकेला सहकार्य करावे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

अमरावती महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही बिलांचे वाटप करण्यात आले आहे. नागरिकांना मालमत्ता कर बिलाचे वाटप करण्यात आले असून नागरिकांनी मालमत्ता कर भरुन महानगरपालिकेला सहकार्य करावे असे आवाहन महानगरपालिका उपायुक्त तथा मुल्यनिर्धारक नि कर संकलन अधिकारी नरेंद्र वानखडे यांनी केले आहे.

अमरावती महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्वच बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यात आली आहे. मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेतील कर वसुली लिपिकांवर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणार्या कर वसुली लिपिकांना महानगरपालिकेच्या वतीने ओळखपत्र ही देण्यात आले आहेत. सर्व बिलांचे वितरण करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. नागरिकांनीही बिल वाटप करण्यासाठी येणार्या कर वसुली लिपिकांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिका उपायुक्त तथा मुल्यनिर्धारक नि कर संकलन अधिकारी नरेंद्र वानखडे यांनी केले आहे.



अमरावती महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील.

यासंदर्भात महानगरपालिका उपायुक्त तथा मुल्यनिर्धारक नि कर संकलन अधिकारी नरेंद्र वानखडे म्हणाले, कर वसुली लिपिकामार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरुन महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्ता धारकांच्या मालमत्ता कर ऑनलाईन भरण्याकरिता महानगरपालिकेची वेबसाईट www.amravaticorporation.in तथा www.amravatimc.in व amravatimc.org या संकेतस्थळावर विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच मालमत्ता कर धारकांना मालमत्ता कर भरणा करण्याबाबत कोणतीही तक्रार व मदत लागल्यास कृपया महानगरपालिकेशी संपर्क साधावे असे आवाहन उपायुक्त तथा मुल्यनिर्धारक नि कर संकलन अधिकारी नरेंद्र वानखडे यांनी केले आहे.

# शेतात मोती पिकविण्यासाठी सोने-चांदी गहाण

## मशागत पूर्ण, जिल्ह्यात खते, बियाण्यांसाठी लगबग : कर्ज मिळविण्यासाठी थकीत कर्जदारांची तारांबळ



**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

जिल्ह्यात खरीप हंगामाची लगबग वाढली आहे. बी-बियाणे आणि खते खरेदीसाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे. काही बँका नियमित कर्ज उचलून परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना पीककर्ज देतात. बऱ्याच वेळा कर्ज वेळेवर मिळत नाही. थकीत असणाऱ्या शेतकऱ्यांना तर बँका दारातही उभे करीत नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना शेती कसण्यासाठी जवळची सोने-चांदी गहाण ठेवून वेळप्रसंगी विकून शेती करावी लागत आहे.

अमरावती जिल्ह्यात पाच वर्षापासून शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. निसर्गाचा लहरीपणा आणि शेतमालाला भाव नसल्यामुळे बऱ्याच वेळा तर शेतीत लावलेला पैसाही निघत नाही. शासनाने जाहीर केलेला हभीभावही शेतकऱ्यांच्या पदरी पडत नाही. त्यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होत आहेत. यातूनच आत्महत्यासारखा टोकाचा निर्णय घेताना शेतकरी दिसून येतो. एकीकडे बी-बियाणे, खत व मजुरीचे दर दरवर्षी वाढत आहेत. यंदा बियाण्यांचे दर १०० ते २०० रुपयांनी वाढले आहे तर खताच्या दरात ५० ते ३०० रुपयांची वाढ झालेली आहे. या वाढत्या दरांमुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट ओढावले आहे.

### मोडीचा भाव काय ?

शुद्ध सोन्याला (मोड काढून) ८० टक्क्यांपर्यंत रक्कम दिली जाते. गहाण ठेवलेल्या वस्तूवर ६० ते ७० टक्के इतकी रक्कम कर्ज स्वरूपात दिली जाते. थकीत शेतकरी वस्तू गहाण ठेवूनच आपली अडचण भागवितात.

थकीत शेतकऱ्यास बँक पीक कर्ज देण्यास टाळाटाळ होते. विविध कागदपत्रांची मागणी केली जाते. त्यामुळे थकीत कर्जदारांना अडचणी येतात. सोने-चांदी गहाण ठेवण्यासाठी अनेकदा सराफांकडे शेतकरी धाव घेतात.

**सराफा व्यावसायिक**

निवडणुकांत शेतकऱ्यांच्या नावाने मत मागितले जाते. परंतु, निवडणुकांत जिंकताच धनदांडग्यांचे कर्ज माफ केले जाते. गरीब शेतकऱ्यांचे कर्ज थकीत राहते. त्यामुळे कर्जबाजार अवस्थेत शेतकऱ्यांना जीवन जगावे लागते. शासनही शेतकऱ्यांच्या पाठीशी नसल्याची भावना शेतकऱ्यांत आहे. थकीत शेतकऱ्यांना कर्ज देण्याची व्यवस्था शासनाने करावी.

**प्रदिप बंड शेतकरी, जसपूर**

गत पाच वर्षांपासून शेतमालाला खुल्या बाजारात हमीभाव मिळत नाही. दिवाळीत आधारभूत धान खरेदी केंद्र सुरू होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती नाजूक आहे. अनेकदा खर्चही शेतीतून निघत नाही. परंतु, वडिलोपार्जित शेती म्हणून सोने गहाण ठेवण्याची वेळ येते.

**मंगेश देशमुख शेतकरी (वणी बेलखेड)**

# आयटीआयची पहिली यादी ९ जुलै रोजी होणार जाहीर; २६ जूनपर्यंत प्रवेशअर्ज भरता येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने राज्यातील कौशल्य शिक्षण देणाऱ्या आयटीआयमधील विविध अभ्यासक्रमांचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. सुधारित वेळापत्रकाप्रमाणे विद्यार्थ्यांना २६ जूनपर्यंत अर्ज करता येणार असून, प्राथमिक गुणवत्ता यादी ३० जून रोजी जाहीर करण्यात येणार आहे. तसेच पहिली गुणवत्ता यादी ९ जुलै रोजी जाहीर करण्यात येणार आहे. राज्यामध्ये १ हजार ७ आयटीआय संस्था असून, त्यामध्ये शासकीय ४१९,तर खासगी ५८८ संस्था आहेत. आयटीआयच्या विविध अभ्यासक्रमांसाठी १५ मेपासून ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली. आतापर्यंत जवळपास १ लाख ४० हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी आयटीआयच्या प्रवेशासाठी नोंदणी अर्ज भरले आहेत. नोंदणी अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांपैकी १ लाख २५ हजार विद्यार्थ्यांनी शुल्क भरून अर्ज निश्चित केले आहेत. त्याचप्रमाणे ६८ हजार ५८३ विद्यार्थ्यांनी आयटीआय अभ्यासक्रमांचे पसंतिक्रम भरले आहेत. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने सुरुवातीला फक्त नोंदणी वेळापत्रक जाहीर केले होते, मात्र आता प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना २६ जून पर्यंत नोंदणीसाठी मुदत देण्यात आली आहे. तसेच नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेशाची प्राथमिक गुणवत्तायादी ३० जून रोजी सकाळी ११ वाजता प्रसिद्ध करण्यात येणार आहे. प्राथमिक गुणवत्तायादीबाबत विद्यार्थ्यांना हरकती नोंदविण्यासाठी मुदत देण्यात येणार आहे. हरकती नोंदवल्यानंतर संचालनाकडून अंतिम गुणवत्तायादी ३ जुलै ला ५ वाजेपर्यंत जाहीर करण्यात येणार आहे. यानंतर ९ जुलै रोजी पहिली निवड यादी जाहीर होणार आहे. पहिली प्रवेश फेरी १० जुलै ला होणार आहे. प्रवेश प्रक्रियेच्या नियमित चार फेऱ्या आणि त्यानंतर संस्थास्तरावर समुपदेशन प्रवेशफेरी राबविण्यात येणार आहेत.यासंदर्भात अधिक माहिती देताना अमरावती येथील संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे अधीनस्थ प्रभारी उप- प्राचार्य - संजय बोरोडे यांनी सांगितले




# बस चालवताना चालक मोबाइलवर बोलण्यात मग्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

सुरक्षित प्रवासाची हमी देणाऱ्या एसटी महामंडळाचे दावे कसे फोल आहेत, याचेच एक संतापजनक उदाहरण नुकतेच सर्वांपुढे आले आहे. यवतमाळ ते अमरावती महामार्गावर धावणाऱ्या एसटी बसचा चालक भरधाव बस चालवताना चक्क मोबाइलवर बोलत होता. असे वागून आपण प्रवाशांच्या जीवाशीच खेळत आहोत, याचेही या चालकाला भान राहिले नाही. या गंभीर प्रकाराची दखल अमरावती एसटीच्या विभागीय नियंत्रकांनी घेतली असून कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत.



बुधवार, ११ जूनला यवतमाळ येथून अमरावतीकडे निघालेली बस (क्रमांक एमएच १४ एलएक्स ७५७४) ही नांदगाव खंडेश्वर मार्गे प्रवास करत असताना बसचालक मोबाइलवर संभाषण करत असल्याचे प्रवाशांच्या निदर्शनात आले. चालकाचे हे वर्तन पाहून बसमधील सुज्ञ प्रवाशांनी त्वरित ही घटना आपल्या मोबाइलमध्ये कैद केली.

# शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी बाजारात गर्दी

# दर वाढले पालकांना भुर्दंड

## प्लास्टिक ऐवजी स्टील डब्यांना पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

शाळेची पहिली घंटा वाजण्यापूर्वी साहित्य खरेदीकडे पालकांचा कल दिसून येत आहे. शाळा सुरु होण्यास अवघे काही दिवस शिल्लक असल्याने बाजारात शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी विद्यार्थी व पालकांची एकच लगबग सुरु झाली आहे. विशेष म्हणजे आता प्लास्टिक ऐवजी स्टीलच्या डब्यांना सर्वाधिक पसंती मिळत असल्याचे चित्र बाजारपेठेत दिसून येत आहे. विदर्भातील शाळा २३ जून रोजी उघडणार असल्याने शहरातील बाजारपेठा आणि शैक्षणिक साहित्यांच्या दुकानांमध्ये पालकांची गर्दी पाहायला मिळत आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपत असल्याने बाजारात खरेदीसाठी गर्दी वाढली आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या पेन्सिल्स, कंपास बॉक्स, आकर्षक पेन्स, पाण्याच्या बाटल्या, स्कूल बॅग्ज आदी साहित्याने दुकानें सजली आहेत. शैक्षणिक साहित्याचे दर वाढले असल्याने



पालकांच्या खिशाला यंदा कात्री लागली आहे. शाळा सुरु होण्यापूर्वी गणवेश, नवे बूट, दफ्तर, वह्या, पुस्तके, कंपास, पाऊच या शालेय साहित्याची खरेदी करण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांची विविध बाजारानंसह डी - मार्ट व स्टेशनरीच्या दुकानांमध्ये गर्दी वाढू लागली आहे. यंदाही बाजारापेठांमध्ये विद्यार्थ्यांना आकर्षित करणाऱ्या वह्या उपलब्ध आहेत. मुलांच्या आवडीनुसार कार्टून, विविध गाड्या, खेळाडू, निसर्ग आदी चित्रे वह्यांवर दिसत आहेत. विविध रंगांच्या कार्टूनची चित्रे असणाऱ्या विविध आकारांच्या स्कूल बॅग्ज बाजारात आल्या आहेत. शिवाय बार्बी डॉल्स, स्पायडर मॅन यांची चित्रे असलेल्या बॅग्ज तसेच टिफिन बॉक्सही विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. मात्र किंमती जास्त असल्याने अनेक दुकानात पालक मुलांच्या हट्टाला आवर घालताना दिसून आलेय. खोडरबर, पेन्सिल पेन्स, रंगपेटी या साहित्याचा एकत्रित संच देखील बाजारात उपलब्ध आहे. हा संच घेण्याकडे कल वाढला असल्याचे दुकानदारांकडून सांगण्यात आले. याशिवाय सर्वत्र स्टीलच्या बाटल्या, स्टीलच्या फॅन्सी टिफिनला मागणी वाढली आहे.

# खबरदार! घोरपड, ससे, रानडुकरांची शिकार कराल तर

## वनविभाग अलर्ट मोडवर : पावसाळ्यात ग्रामीण भागात होतात शिकारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मोर्शी**

पावसाळा सुरु होताच अनेकजण वन्यजिवांची शिकार करण्यासाठी जंगलाची सैर करतात. ग्रामीण भागात पहिला पाऊस पडल्यानंतर नांगरणीच्या कामाला सुरुवात होते. सोबतच शेतशिवारात दडून बसलेल्या घोरपडीची शिकार अनेकदा केली जाते. हा कायद्याने गुन्हा असल्याने व शिकारीचे प्रमाण रोखता यावे, यासाठी वनविभाग अलर्ट मोडवर आहे.

वन्यजिवांची शिकार हा गंभीर गुन्हा असून, भारतीय वन्यजीव संरक्षण कायद्यान्वये दंड व शिक्षेची तरतूद आहे. घोरपड, हरीण, वाघ, सांबर, नीलगाय आदी वर्ग १च्या



वन्यजिवांची शिकार कारावासही घडवू शकते. वन्यजीव आणि त्यांच्या अधिवासाच्या संरक्षणासाठी वन्यजीव संरक्षण कायदा तयार करण्यात आला आहे. शिकार वा मांस विक्री हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर वन विभागाकडून कारवाई केली जाते. अमरावती जिल्ह्यातजंगलाला लागून शेतशिवार असल्याने घोरपडीसारख्या प्राण्यांच्या शिकारी या दिवसात वाढतात. मात्र, वनवन विभाग ॲक्शन मोडवर असून, शिकारीची माहिती मिळाल्यास शिकाऱ्यांवर कठोर कारवाई होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी वन्य प्राण्यांची शिकार करू नये, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

**वन्यजीव संरक्षण अधिनियम**

भारतीय वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ हा वन्यजिवांचे संरक्षण आणि सुरक्षिततेसाठी तयार केला आहे.वनक्षेत्रासह अन्य भागातही सरपटणाऱ्या आणि बिगर सरपटणाऱ्या वन्यजिवांच्या संरक्षणासाठी हा कायदा लागू आहे. तीन महिन्यांपूर्वी बहुलिया टोळीतील सदस्य राजुरा परिसरात मिळाल्याने जिल्ह्यातील वनविभाग बहेलिया टोळीबाबत अलर्ट आल्यानंतर वनविभाग सतर्क झाला. जिल्ह्यात शिकारीच्या घटना कमी झाल्या असल्या तरी शिकारी रोखण्याकरिता वनविभाग प्रयत्न करत आहे.

**ग्रामीणसह शहरी भागातही मागणी**

जिभेचे चोचले पुरविण्याकरिता ग्रामीण भागासह शहरी भागातही घोरपडीच्या मटणाची मोठी मागणी आहे. याकरिता परिचित लोकांकडून मटण आणून देण्याची मागणी केली जाते. अत्यंत गोपनीयता बाळगत मटणाची देवाण-घेवाण ग्रामीण भागात होतानाचे चित्र आहे.

# चंद्रपूर जिल्हा होणार हनी हब! देशातील पहिले 'मधाचे गाव' मांघरला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४चंद्रपूर**

मध उत्पादनाच्या माध्यमातून 'हनी हब' बनवण्याच्या दिशेने एक ठोस पाऊल उचलण्यात आले आहे. राज्याचे माजी वनमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून मधुमक्षिका पालनासाठी मामला व पिरली या गावांची ३ जानेवारी २०२४ रोजी 'मधाचे गाव' म्हणून घोषणा



करण्यात आली होती. या घोषणेनंतर सुरू झालेल्या उपक्रमांतून आता प्रत्यक्ष प्रशिक्षण व प्रात्यक्षिक टप्पा राबवण्यात येत आहे. आमदार मुनगंटीवार यांचे प्रयत्न या क्षेत्रासाठी गेम चेंजर ठरणार आहे.

जिल्ह्यातील ४० प्रशिक्षणार्थींनी नुकतीच देशातील पहिले 'मधाचे गाव' म्हणून प्रसिद्ध असलेल्या मांघर (ता. महाबळेश्वर, जि. सातारा) येथे भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी स्थानिक व्यवस्थापन व ग्रामस्थांकडून वर्षभरात ७ ते ८ हजार किलोपर्यंत होणाऱ्या मध उत्पादनाच्या यशस्वी कार्यपद्धतीची सविस्तर माहिती घेतली.

मधसंचय, प्रक्रियेची शिस्तबद्ध पद्धत, बाजारपेठेचा अभ्यास आणि ग्रामसंघटनात्मक एकात्मतेची उदाहरणे यांचा थेट अनुभव प्रशिक्षणार्थींनी घेतला. यावेळी प्रशिक्षणार्थ्यांना सीबीआरटीआय, पुणे आणि मधसंचालनालय महाबळेश्वर येथे विशेष प्रशिक्षणही देण्यात आले. यामध्ये मधुमक्षिका पालन, पेटी व्यवस्थापन, कीटकनाशकांचा प्रभाव, वनीकरणाशी समन्वय इत्यादी बाबींवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमांमुळे शेतकरी मध उत्पादनाच्या क्षेत्रात नव्या संधींचा लाभ घेण्यासाठी सज्ज होत आहे.

# राज्यात मान्सूनची वेगाने आगेकूच:अनेक जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद; मराठवाडा, विदर्भात दोन दिवसांचा यलो अलर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

मान्सूनचा वेग पुन्हा वाढल्यामुळे २५ जूनपर्यंत दिल्लीसह वायव्य भारतातील बहुतांश भागांमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. हवामान विभागानुसार १८ जूनपर्यंत मान्सून मध्य आणि पूर्व भारतातील उर्वरित भागांमध्ये तसेच वायव्य भारतातील काही भागांमध्ये पोहोचेल. त्यानंतर १९ ते २५ जून दरम्यान हा वायव्य भारतातील बहुतांश भाग व्यापेल. रखडलेला मान्सून महाराष्ट्रातही सक्रिय झाला आहे. पुढील ४८ तासांत मान्सून संपूर्ण विदर्भ व्यापणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. कोकणात अति मुसळधार, मध्य महाराष्ट्रात मुसळधार तर मराठवाडा व विदर्भात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला.

दक्षिण-पश्चिम मान्सूनने महाराष्ट्रात दमदार प्रवेश केला असून, कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या चारही विभागांत पावसाने चांगली हजेरी



लावली आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, जूनच्या दुसऱ्या आठवड्यात मान्सूनने राज्यात वेगाने आगेकूच केली असून अनेक जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. शेतकऱ्यांसाठी ही दिलासादायक स्थिती मानली जात आहे.

**विदर्भात पावसाची चांगली सुरुवात**

विदर्भातील नागपूर, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांत जोरदार पावसाने सुरुवात केली आहे. यवतमाळ जिल्ह्यात काही भागांत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. नागपूरमध्ये१३ जूनला ७५ मिमी पावसाची नोंद झाली. भारतीय हवामान विभागाने यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर येथे यलो अलर्ट जारी केला आहे.

**पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज**

पुढील दोन दिवसांत महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात विजांच्या कडकडाटासह मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर परिसरात पावसाच्या सरी कायम राहतील. विदर्भात काही भागांत यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पावसामुळे पेरणीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

# १५ जुलैपासून तत्काळ तिकीटासाठी 'ओटीपी' विना बुकिंग नाही!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४बडनेरा**

सामान्य प्रवाशांना तत्काळ तिकीट योजनेचा सुलभपणे लाभमिळावा, यासाठी रेल्वे प्रशासनाने काही महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. लवकरच या निर्णयाची रेल्वे प्रशासनाकडून अंमलबजावणी केली जाणार आहे.

१ जुलैपासून तत्काळ सुविधा अंतर्गत तिकिटांची बुकिंग फक्त भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळ (आयआरसीटीसी) च्या वेबसाइट किंवा मोबाइल ॲपमार्फत आधार प्रमाणीकरण केलेल्या वापरकर्त्याद्वारेच शक्य असणार आहे. यासोबतच १५ जुलैपासून तत्काळ तिकीट बुकिंगसाठी आधार आधारित ओटीपी प्रमाणीकरण बंधनकारक करण्यात आला आहे.

तत्काळ तिकिटांची बुकिंग रेल्वेच्या संगणकीकृत पीआरएस काउंटरवर किंवा अधिकृत एजंटांमार्फत सिस्टमद्वारे पाठवलेल्या ओटीपीच्या प्रमाणीकरणानंतरच होऊ शकतो. हा ओटीपी प्रवाशाने बुकिंग करताना दिलेल्या मोबाइल क्रमांकावर पाठवण्यात येणार आहे. ही सुविधादेखील १५ जुलैपासून लागू करण्यात येईल. रेल्वे प्रशासनाकडून नव्याने सुरू केलेल्या सोई सुविधेमुळे रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**एजंटांच्या अवाजवी हस्तक्षेपाला आवर**

रेल्वेचे अधिकृत तिकीट एजंट तत्काळ बुकिंगच्या पहिल्या दिवशी सुरुवातीच्या ३० मिनिटांपर्यंत तिकीट बुक करू शकणार नाहीत.